**मार्गदर्शक सूचना**

जा.क्र.शेमासे/कृषिदिन/ २८४ /१७
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
दिनांक - ८ जून २०१७

**प्रती,**

**विभागीय कृषि सहसंचालक** (सर्व)------------
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी** (सर्व)---------------
**प्रकल्प संचालक (आत्मा)** (सर्व) ------------------
**कृषि विकास अधिकारी** (जिल्हा परिषद) (सर्व)-----------------

**विषय - महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांची जयंती राज्यात दि. १ जुलै २०१७ कृषिदिन म्हणून साजरी करणेबाबत .....**

संदर्भ – कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्रमांक कृषिदि-०५१७/प.क्र.७३/३अे , दि. २ जुन, २०१७

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांनी कृषि क्षेत्रात केलेल्या भरीव योगदानाबद्दल १ जुलै हा त्यांचा जन्मदिवस राज्यात कृषिदिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येतो. चालू वर्षी सुध्दा कृषिदिन साजरा करण्याबाबत शासनाने संदर्भीय शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार जिल्हा आणि तालुका स्तरावर कृषिदिनाचे आयोजन करावे. कृषि दिनाच्या आयोजनाबाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

विभागीय कृषि सहसंचालक यांनी त्यांच्या अधिनस्त असलेले जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा) व कृषि विकास अधिकारी यांचेशी विचार विनिमय करून विभागातील सर्व जिल्ह्यांच्या कार्यक्रमांचे नियोजन करून कार्यक्रम यशस्वीपणे पार पडेल याची दक्षता घ्यावी.

**जिल्हास्तर-** कृषि दिनाच्या निमित्ताने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा) आणि कृषि विकास अधिकारी यांनी पुढाकार घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करावे. त्यासाठी पालकमंत्री, जिल्ह्यातील सन्माननीय लोक प्रतिनिधी, जिल्हास्तरीय अधिकारी, आत्मातंर्गत शेतकरी सल्लागार समितीचे जिल्हास्तरीय सदस्य, प्रगतीशील शेतकरी यांना निमंत्रीत करावे. तसेच या कार्यक्रमामध्ये कृषि शास्त्रज्ञ, पुरस्कार प्राप्त शेतकरी यांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करावीत. या निमित्ताने जिल्हास्तरीय कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात यावे. कृषिविषयक निबंध स्पर्धा, चित्रकलास्पर्धा इ. चे आयोजन करावे. तसेच १ जुलै २०१७ रोजी कै. वसंतरावजी नाईक यांच्या कृषि क्षेत्रातील योगदानाबाबत स्थानिक वृत्तपत्रांमध्ये माहितीपर लेख प्रसिध्दी करावेत.

**तालुकास्तर-** तालुका स्तरावरील कार्यक्रमाचे नियोजन करून व्यवस्थितरित्या कृषिदिन साजरा होईल यांची दक्षता उपविभागीय कृषि अधिकारी यांनी घ्यावी. त्यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व तालुक्याच्या ठिकाणी तालुका कृषि अधिकारी व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे मदतीने व समन्वयाने कार्यक्रमांचे नियोजन करून सदर कार्यक्रमाचे आयोजन तालुका मुख्यालयात करावे.

सदर कार्यक्रमास तालुका स्तरावरील सन्माननीय लोक प्रतिनिधी, प्रगतीशील शेतकरी, शेतकरी मित्र, तालुकास्तरीय इतर अधिकारी, आत्मातंर्गत स्थापन झालेल्या शेतकरी सल्लागार समितीचे तालुकास्तरीय सदस्य, तालुक्यातील शेतकरी उत्पादक कंपनी प्रतिनिधी यांना निमंत्रीत करावे. कार्यक्रमा निमित्त कृषि शास्त्रज्ञ, तालुक्यातील पुरस्कार प्राप्त पुरूष व महिला शेतकरी यांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजीत करावीत. कृषि माहिती विषयक चित्रफिती, प्रदर्शन, निबंध/चित्रकला स्पर्धा इत्यादिचे आयोजन करावे.

**खर्चाचा तपशील** – कृषिदिना निमित्त प्रत्येक पंचायत समिती करीता जास्तीत जास्त रू. १५००/- (रू. एक हजार पाचशे) तसेच जिल्हा परिषद मुख्यालयी कृषिदिन साजरा करणेसाठी प्रत्येक जिल्हा परिषदेकरिता रू. २०००/-(रू. दोन हजार मात्र) या प्रमाणे जिल्हा परिषद सेस फंडातील उपलब्ध निधीमधून खर्च करण्यात यावा. कृषि विकास अधिकारी यांनी जिल्हा सेस फंडातून खर्च करण्याकरिता या मार्गदर्शक सूचनेनूसार कार्यवाही करावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयुक्तालयास त्वरीत सादर करावा.

**कृषि संचालक (विप्र)**
कृषि आयुक्ताल, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत-** १) मा. अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर
२) मा. आयुक्त कृषि, कक्ष, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव.
३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) ----------------- यांना माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव.